# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १७/०१/२०२२

## <u>मा. महासभा</u>

मा. महासभा सुचना क्र. ०७

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिराभाईंदरमहानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. २५/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती.

मा. महापौर यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

टिप :- सन्मा. पालिका सदस्यांना विनंती करण्यात येत आहे की, Online महासभेला Join होण्यासाठी खालील काही सुचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र. | सुचना |
|---|---|
| 1. | आपणांस ईमेलद्वारे किंवा मोबाईलवर Video Conferencing ची Link पाठविण्यात येईल. |
| 2. | सदर Link ओपन केल्यावर येणारे Zoom Mobile App Download डाऊनलोड करून Video Conference बैठकीत 15 मिनीटे अगोदर सहभाग घ्यावा. |
| 3. | डाव्या बाजुला खाली Mic च्या Symbol वर Click केल्यावर Call Over Internet चे बटन दाबावे. |
| 4. | सन्मा. पालिका सदस्यांनी सभा Join करताना आपले पूर्ण नाव व प्रभाग क्रमांक टाकून लॉगीन करावी. |
| 5. | सभा सुरु होण्याची वेळ सकाळी ११.०० ची जरी असली तरी सभेस Join होण्याची वेळ दुपारी १०.४५ चीआहे. |
| 6. | सन्मा. सदस्यांना सभेत बोलावयाचे असेल तेव्हा More मधील Raise Hand बटनावर Click करावे. यामुळे मा. महापौर यांना समजेल की, आपणास बोलायचे आहे. किंवा आपला हात वर करावा. तसेच मा. महापौर यांचे परवानगीने बोलावे. |
| 7. | कृपया सभेला Join होण्यासाठी हेडफोनचा वापर करावा. |
| 8. | सन्मा. पालिका सदस्यांना पाठविण्यात आलेली Link अन्य कोणत्याही व्यक्तीस Share करु नये. |
| 9. | Logout झाल्यास सभेमध्ये पुन्हा सहभागी होण्यासाठी User id आणि Password चा वापर करावा. |
| 10. | काहीही तांत्रिक अडचण भासल्यास पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.<br>श्री. राज घरत, सिस्टीम मॅनेजर - 8422811399 |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा मंगळवार दि. २५/०१/२०२२ सभा सुचना क्र. ०७

विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - |
| -- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| ८० | दि. 02/09/2021 रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | सरकारी पत्रे - |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ८१ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे. |
| ८२ | महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत. |
| ८३ | महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात दोषारोप दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| ८४ | मिरा भाईंदर शहरातील 500 चौ. फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर माफ करणेबाबत. |
| ८५ | भाईंदर (पूर्व) नवघर हनुमान मंदिर पाठीमागील गोदावरील इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे. |
| ८६ | मिरारोड (पूर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वे समांतर नाला आनंद छेडा इमारतीच्या विरुध्द बाजूस ते उड्डाणपुलापर्यंत नाल्याची पुर्नबांधणी करणे. |
| ८७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण व जतन करणे कामाबाबत. |
| ८८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर स्वखर्चाने कचरा प्रकल्प तयार करणेसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत. |
| ८९ | ॲटोमॅटीक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत. |
| ९० | ॲटोमॅटीक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत. |
| ९१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत बांधकाम प्रस्तावामध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर अनामत शुल्काबाबत. |
| ९२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके इत्यादी ठिकाणची निगा व देखभाल करणेच्या कामाची माहिती सादर करणेकरीता मा. महापौर यांनी दि. 27/12/2021 रोजीचे पत्र संदर्भात वस्तुस्थिती अहवाल. |
| ९३ | सन 2022-23 या आर्थिक वर्षात कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई व सक्शन पंप भाड्याने घेणे कामाची निवीदा मागविणेबाबत. |
| ९४ | शहरातील इमारतींना नळ जोडण्या बंद करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे. |
| ९५ | शहरातील इमारतींमध्ये उभ्या राहणाऱ्या वाहनांच्या पार्कींग जागेवर कर आकारणी करणेच्या प्रशासनाच्या आदेशाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे. |
| ९६ | आकृतीबंधामध्ये मंजुर पदापेक्षा जास्त पदांवरील उपायुक्तांना शासनाच्या सेवेत वर्ग करुन महापालिकेतून कार्यमुक्त करणेबाबत निर्णय घेणे. |
| ९७ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात निविदांची मुदत संपलेली असुनही नियमबाह्य मुदतवाढ देणे व मुदतवाढ नसतानाही देयक अदा केलेल्या संबंधीतांवर कारवाई करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |

| | |
|---|---|
| ९८ | आरक्षण क्र. 364 बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ९९ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील अनामत रक्कमे बाबत विचार विनीमय करणे. |
| १०० | महापालिकेच्या काही विभागात निविदा न काढता ठेका पध्दतीने मजुर व कर्मचारी घेणेकरीता ठराविक ठेकेदारांना प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने मजुर व कर्मचारी पुरवठा करण्याचे कार्यादेश दिलेले आहेत, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत निर्णय घेणे. |
| १०१ | परिवहन उपक्रमात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेकामी अवलंबिलेली पध्दत इतर विभागात नियुक्त करताना अवलंबिली जात नाही याबाबत विचार विनीमय करणे. |
| १०२ | कोविड कालावधीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेतील काम केलेल्या कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देणेबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- १७ जानेवारी २०२२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २५/०१/२०२२ रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| |
|---|
| ३७. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१०/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) म.न.पा. ने शहरातील उद्याने, मैदाने, स्मशानभूमी व दुभाजके निगा व देखभालीसाठी ठेकेदार नेमले आहे त्या कामापैकी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व प्रभाग समिती क्र.3 मधील आरक्षण क्र. 122क मैदान (सचिन तेंडूलकर मैदान) ह्यामधील अनावश्यक गवत काढणे, मैदानातील गवत कटींग करणे, फक्त ह्या कामापोटी एप्रिल 21 ते सप्टेंबर 21 ह्या कालावधीतील कामासाठी अनुक्रमे रु. 83,29,499/- व रु. 51,56,432/- इतकी रकमेची देयके अदा केलेली आहेत अशी शहरामध्ये चर्चा आहे हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक मैदानातील एस्टीमेटमधील स्पेसिफिकेशननुसार प्रत्येक ॲटमवार झालेले काम, अदा केलेली रक्कम, महिनानिहाय तपशिलवार माहिती देण्यात यावी. |
| ब) MAC 1971 नियम 180 प्रमाणे ठेक्याच्या झालेल्या कामाची बाबनिहाय नोंदी मोजणी पुस्तकामध्ये (MAC 1971 नियम 136) घेण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी त्यातील दर (मुळ एस्टीमेट दराप्रमाणे आहेत किंवा नाही) तपासूनच देयके अदा करण्याची तरतुद आहे. मोजणी पुस्तकातील नोंदी तपासून देयके अदा केली आहेत किंवा कसे? मोजणी पुस्तकातील नोंदी कोणी तपासल्या आहेत? |
| ३८. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने निगा व देखभाल कामाच्या एस्टीमेट रु. 26.58 कोटीला MAC 1971 नियम 160 प्रमाणे महासभेची प्रशासकीय / आर्थिक मंजूरी आहे का? |
| अ) असल्यास, ठराव मंजूरी क्रमांक, तारीख प्रमाणित करावी. |
| ब) एस्टीमेटला MAC 1971 नियम 161 नुसार तांत्रिक मंजूरी आहे काय? मंजूरी आदेश प्रत द्यावी. |
| क) एस्टीमेटमधील दर MAC 1971 नियम 166 नुसार (लागु केलेल्या दरसुचीप्रमाणे) नुसार जादा आहेत हे खरे आहे काय? |
| ड) असल्यास, अशाप्रकारे जादा दराने (दरसुचीपेक्षा) एस्टीमेट तयार करणे MAC 1971 नियम 166 चे उल्लंघन करणारे आहे हे खरे आहे काय? |
| इ) एस्टीमेटला तांत्रिक मंजूरी नसल्याने सदर एस्टीमेट अवैध ठरत आहे त्यामुळे ठरलेल्या एस्टीमेट दराप्रमाणे देयक अदा करणे नियमबाह्य आहे हे खरे आहे काय? |
| ३९. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. २९/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने निगा व देखभालसाठी दिलेल्या कार्यादेश (12/04/2021) प्रमाणे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व आरक्षण क्र. 122 क सचिन तेंडूलकर मैदान कामापोटी (एप्रिल 21 ते सप्टेंबर 2021) कालावधीमध्ये अनुक्रमे रु. 78,19,659/- व रु. 36,80,306/- देयके अदा केली आहेत.<br>निविदा एस्टीमेट प्रमाणे लाल माती, शेणखत टाकणे, अकुशल व कुशल मजूर पुरवठा व मेलेले गवत/झाडे पुन्हा लावणे ह्या पाच कामांचा समावेश आहे. परंतु प्रत्यक्षात पूर्णतया पाच ॲटम नुसार कामेच झाली नाहीत हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीचा (प्रत्यक्षात झालेल्या कामाची) माहिती होणे आवश्यक आहे. एस्टीमेट मधील स्पेसिफिकेशननुसार ॲटम बार (बाबवार) प्रत्यक्ष झालेले काम, त्याचे मुल्यांकन, मोजणी पुस्तकामध्ये (नमुना नं. 136) नोंदविलेल्या बाबी / कामाप्रमाणे महिना निहाय (बाबवार) माहिती देण्यात यावी. |
| ब) महासभा दि. 24/12/2021 प्रश्न क्र. 37 दिलेल्या उत्तरानुसार सदर कामाची (बाबवार) मोजमापे मोजणी पुस्तकात नोंदविलेली आहेत. मोजणी पुस्तकामध्ये ॲटमप्रमाणे (एस्टीमेट) नोंद होत असते. त्यामुळे मोजणीपुस्तकांची (एप्रिल 21 ते सप्टेंबर 2021) कालावधी) प्रमाणित प्रत मिळावी अथवा मोजणी पुस्तक नोंदवहीची प्रमाणित प्रत सभागृहाच्या पटलावर सादर करावी. |
| ४०. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. ०३/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) महापालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या मंजूर पदानुसारच (आस्थापना सुची प्रमाणेच) वेतन देयक देण्याची |

| |
|---|
| तरतुद असताना देखील मंजूर पदांपेक्षा (आस्थापना सुचीपेक्षा) जादा पदांचे वेतन देयक अदा केले जातात हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, वस्तुस्थितीची माहिती होणे आवश्यक आहे. मंजूर पदे, (आस्थापना सुचीप्रमाणे) विभाग निहाय/पद निहाय माहिती मिळावी. अदा केलेली वेतन देयके त्यामध्ये विभाग निहाय / पद निहाय असलेली माहिती मिळावी. वेतन देयकाची (ह्यामध्ये कायम कर्मचारी/ठेक्यावर असलेली कर्मचारी/अस्थायी असलेले कर्मचारी सर्व कायम अस्थायी / ठेका वरील तात्पुरत्या / कायम कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.) माहिती मिळावी. |
| ब) महापालिकेच्या आस्थापना खर्चावर शासनाच्या मानकाप्रमाणे /निर्बंधाप्रमाणे किती टक्के पर्यंत खर्च करणेची मर्यादा आहे? प्रत्यक्षात (2020-21 वर्षात) झालेल्या खर्चाची टक्केवारी किती आहे? |
| क) आस्थापनेवरील खर्च शासनाने घालून दिलेल्या निकषापेक्षा जास्त होत असल्यास, आस्थापनेवरील खर्च यापुढे वाढून देणेबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे व त्यासाठी कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत? |
| ४१. श्री. अजित भ. पाटील मा. सदस्य यांनी दि. ३१/१२/२०२१ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) शहरातील एकूण किती सार्वजनिक शौचालये आहेत ज्यांची देखभाल मनपा करते? |
| अ) सदर कामांचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे? |
| ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे? |
| क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली? |
| ४२. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) शहरात एकूण किती सार्वजनिक उद्याने व बगीचा यांची मनपा देखभाल करते? |
| अ) सदर देखभाल व दुरुस्ती कामाचा ठेका मनपाने कधी, कोणाला व कितीला दिलेला आहे? |
| ब) सदर कामाच्या ठेक्यामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव आहे? |
| क) कामामध्ये कसूर केल्या प्रकरणी सदर ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली? |
| ४३. श्री. अनिल दि. सावंत मा. सदस्य यांनी दि. ०१/०१/२०२२ रोजी विचारलेला प्रश्न. |
| १) शहरामध्ये किती गॅरेजेस आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती? |
| अ) शहरामध्ये किती कार वॉशिंग सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती? |
| ब) शहरामध्ये किती सर्विस सेंटर आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती? |
| क) शहरामध्ये किती वाहन शोरुम आहेत त्यामध्ये अधिकृत किती व अनधिकृत किती? |
| ड) वरील पैकी किती जनांनी मनपाचा परवाना घेतलेला आहे? |
| इ) वरील व्यवसायासाठी प्रती परवाना 10,000.00 प्रमाणे किती परवाना फी मनपाकडे जमा झालेली आहे? |
| ई) किती व्यवसाय मनपा आरक्षण जागेत आहेत? |
| उ) किती व कोणत्या प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणत्या तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दि. |
| ऊ) 15 दिवसात परवानगी न घेतलल्या कोणत्या आस्थापनांवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे? |
| ए) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी मनपाने रस्ते, पदपथ व इतर मोकळ्या जागेत वाहने उभी करुन मनपाला किती दंडाची रक्कम जमा केली? |
| ऐ) प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी केलेला सविस्तर अहवाल काय आहे? |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/७/२०२२

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ७ :- **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे.**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेला अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून [नामनिर्देशित करता] येईल. परंतु अशा [नामनिर्देशित सदस्यांची संख्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.] हे सदस्य, [विहीत करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नामनिर्देशित] करण्यात येतील.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ कलम ३(२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील.

मा. महासभा दि. ७/१२/२०२० (दि. ४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा), ठराव क्र. २३ अन्वये पालिका सदस्यामधून घ्यावयाची सदस्य संख्या ९, बिनसरकारी संघटनाचे प्रतिनिधी २ व आयुक्त पदसिध्द अध्यक्ष अशी एकुण १२ सदस्यांची १ वर्षाकरिता वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

वरीलपैकी शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, शिवसेना पक्षाचे सध्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे. तसेच कॉग्रेस लोकशाही आघाडीच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, कॉग्रेस लोकशाही आघाडीचे सध्याचे तौलानिक संख्याबळ ११ इतके आहे. सद्यस्थितीत असलेल्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात महापालिका सदस्यांमधून घ्यावयाचे सदस्य संख्येसाठी वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | समिती सदस्य १२ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९३ x ९ = ५.९० | ६ | ६१ ÷ ९३ x १२ = ७.८७ | ८ |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९३ x ९ = २.०३ | २ | २१ ÷ ९३ x १२ = २.७० | ३ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | ११ ÷ ९३ x ९ = १.०६ | १ | ११ ÷ ९३ x १२ = १.४१ | १ |

तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून घ्यावयाची सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून घ्यावयाची सदस्य संख्या निश्चीत करुन, वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/ ७ /२०२२

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ८२ :- महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन, महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष समित्यांकरिता सदस्य संख्या नमुद नाही. मा. महासभा दि. ७/१२/२०२०, (दि. ४/१२/२०२० रोजीची तहकुब सभा) ठराव क्र.२४ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करुन ०१ वर्षाकरीता समिती गठित करण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | कॉंग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २२ | १२ (१० + २) |

वरीलपैकी शिवसेना पक्षाच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, शिवसेना पक्षाचे सध्याचे तौलानिक संख्याबळ २१ इतके आहे. तसेच कॉंग्रेस लोकशाही आघाडीच्या एका सदस्याचे निधन झाल्याने, कॉंग्रेस लोकशाही आघाडीचे सध्याचे तौलानिक संख्याबळ ११ इतके आहे. सद्यस्थितीत असलेल्या तौलानिक संख्याबळाचे प्रमाणात महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | मागील गठीत समिती सदस्य संख्या १५ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९३ x ९ = ५.९० | ६ | ६१ ÷ ९३ x १५ = ९.८३ | १० |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९३ x ९ = २.०३ | २ | २१ ÷ ९३ x १५ = ३.३८ | ३ |
| ३ | कॉंग्रेस लोकशाही आघाडी | ११ ÷ ९३ x ९ = १.०६ | १ | ११ ÷ ९३ x १५ = १.७७ | २ |
| एकुण | | -- | ९ | -- | १५ |

तरी महिला व बालकल्याण समितीची मुदत व सदस्य संख्या निश्चीत करुन, महिला व बालकल्याण समिती गठित करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२५/ ७ /2022**

**गोषवारा**

८३

विषय :- महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मा. न्यायालयात दोषारोप दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजूरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

दिनांक 29/09/2021 रोजी कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.1050/2021, कलम 307, 324, 34, 120(ब), 201 भादविसं सह 3,25,27 भाहका सह कलम 37 (1) (अ), 135 मपोका अन्वये नोंद करण्यात आलेल्या गुन्ह्यात अद्यापपावेतो 6 आरोपी अटक करण्यात आलेले आहे. सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या 6 आरोपीपैकी महापालिका कार्यालयात नेमणुकीस असलेले श्री. श्रीकृष्ण सदाशिव मोहिते, कनिष्ठ अभियंता व श्री. यशवंतराव सदाशिव देशमुख, कनिष्ठ अभियंता यांचा सदर गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक 06/10/2021 रोजी अटक करण्यात आलेबाबत जा.क्र.11589/वपोनि/कस्तुरबा मार्ग/पो.ठा./2021, दि.07/10/2021 अन्वये माहिती देण्यात आलेली आहे. सदर आरोपीतांवर दोषारोप दाखल करण्या इतपत सबळ पुरावा प्राप्त करण्यात आलेला आहे, असे पोलीस निरीक्षक, कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी Reference NO:-O.W.No 12990/SR PI/2021, DATE:-29/11/2021 च्या पत्रात नमुद करून श्री. श्रीकृष्ण सदाशिव मोहिते, कनिष्ठ अभियंता व श्री. यशवंतराव सदाशिव देशमुख, कनिष्ठ अभियंता यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यास फौजदारी दंड प्रक्रिया संहीता 197 अन्वये परवानगी मिळणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 59-अ नुसार महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर खटला भरण्यास मंजूरी देणे मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे:-

"कलम 53 किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलीसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील."

श्री. श्रीकृष्ण सदाशिव मोहिते, कनिष्ठ अभियंता व श्री. यशवंतराव सदाशिव देशमुख, कनिष्ठ अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेबाबत जा.क्र.मनपा/आस्था/1954/2021-22, दि.23/12/2021 अन्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहीता 197 अन्वये मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 59-अ अन्वये मंजूरी दिली आहे.

तरी वर नमुद केलेल्या कार्यवाहीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 59-अ नुसार मा. महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
### मा. महासभा दि.२४/७/2021
### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८४ ) :-** भाईंदर (पुर्व) नवघर हनुमान मंदिराच्या पाठीमागील गोदावरी इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्न:बांधणी करणे या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

भाईंदर (पुर्व) नवघर हनुमान मंदिराच्या पाठीमागील गोदावरी इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याचा काही भाग दि.01/09/2020 रोजी कोसळलेला आहे. सदर नाल्याची पाहणी केली असता नाला दगडी भिंतीवर बांधलेला आहे. तसेच नाला पडलेल्या ठिकाणीचा पुढील भाग देखील झुकलेला असल्याने सदर ठिकाणी नाला नव्याने बांधावयास लागणार आहे.

नाला हा हनुमान मंदिराच्या आवारामधुन जात आहे. सद्या कोविड-19 मुळे धार्मिक स्थळ बंद असल्याने सदर ठिकाणी रहदारी कमी आहे. परंतु धार्मिक स्थळे उघडी झाल्यावर सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊ शकते व नाला उघडा असल्याने नाल्यामध्ये पडुन जिवित तसेच वित्तहानी होण्याची शक्यता आहे. सदर कामाचे सन 2020-21 (SSR) नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्या कामी रु.79,14,050/- इतका खर्च अपेक्षित आहे.

भाईंदर (पुर्व) नवघर हनुमान मंदिराच्या पाठीमागील गोदावरी इमारत ते समर्थ कृपा बंगल्यापर्यंत नाल्याची पुर्न:बांधणी करणे. (अंदाजित खर्च रु.79,14,050/-) इतक्या रक्कमेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-6/20-21/SW/MG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. महासभा दि.२५/७ /2021**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (८६) :-** मिरारोड (पुर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वे समांतर नाला आनंद छेडा इमारतीच्या विरुध्द बाजुपासुन ते उड्डाणपुलापर्यंतच्या नाल्याची पुर्न:बांधणी करणेकामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

मिरारोड (पुर्व) नयानगरकडे जाणारा रेल्वेसमांर नाल्यामधुन नयानगर परिसरातील पावसाचे पाणी हे रेल्वेखालील पाईप कल्वर्ट मधुन भाईंदर पश्चिमेकडील खाडीमध्ये जाते. सदर रेल्वे समांतर नाल्यामधील आनंद छेडा इमारती विरुध्द समोरील नाल्यापासुन ते भाईंदर (पुर्व) उड्डाणपुला पर्यंतचा नाला हा सुमारे 20 वर्षापुर्वी बांधण्यात आलेला आहे. सदरचा नाला हा बऱ्याच ठिकाणी तुटलेला आहे. पडदीचे स्टिल दिसत आहे. तसेच सदरचा नाला कधीही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा जलदगतीने निचरा होऊ शकणार नाही. त्यामुळे सदर नाल्याची पुर्न:बांधणी करणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असुन यासाठी रु.2,71,75,000/- इतका अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

सदर कामासाठी महानगरपालिकेचा सन 2021-22 या आर्थिक वर्षाच्या "नविन गटारे / नाले बांधकाम" या लेखाशिर्षकात तदतुद करण्यात आलेली आहे. तरी वरील कामाच्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यतेस शिफारस आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-6/21-221/DK/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा.महासभा दि.25/ 9 /2021**

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

प्रकरण क्रमांक ( 80 ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला परिसर सुशोभिकरण करणे व जतन करणे कामाबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ला हा "राज्य शासनाकडून राज्य संरक्षित स्मारक" म्हणुन घोषित असून "राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजने" अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सदर किल्ला व त्याचा परिसर विकसीत करण्यासाठी पुरातत्व व वस्तु संग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस देण्यात आलेला आहे. त्याबाबत दि.21/06/2019 रोजी करारनामा झालेला आहे. घोडबंदर किल्ला सुशोभिकरण व जतन दुरुस्ती कामाचे सविस्तर प्रकल्प अहवालास दि.18/07/2019 रोजीच्या पत्रान्वये संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रालय, महाराष्ट्र राज्य यांनी मंजुरी दिली आहे.

घोडबंदर किल्ला दुरुस्तीसाठी पहिल्या टप्प्यातील काम करण्यासाठी रु.1,81,67,930/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर कामास मा.महासभा दि.19/05/2017 ठराव क्र.09 अन्वये आर्थीक व प्रशासकीय मंजुरी असून ठेकेदारास इकडील जा.क्र.मनपा/साबां/कार्या/141/2018-19 दि.19/09/2018 रोजी कार्यादेशान्वये देण्यात आलेले होते. सदर पहिल्या टप्प्यातील काम पुर्ण झालेले असुन पहिल्या टप्प्यातील मंजुर कामाचा पुर्ण खर्च झालेला आहे. सदर पहिल्या टप्प्यामध्ये कामामध्ये साईट साफ करणे, विद्यमान स्टोरेज ग्रेनरील सिमेंट प्लॅस्टर करणे, स्टोरेज ग्रेनरीज ग्राऊटींग , चुना प्लॅस्टर करणे, स्टोरेज ग्रेनरीज भिंत मजबुत करणे, प्रवेश व्दारापासुन बागेच्या बाजुला दगडी फरसबंदी पुर्ण करणे, खुल्या मैदानाचे काम, इलेक्ट्रीक वायरिंग इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

दुस-या टप्प्यामध्ये रु.3,65,37,623/- एवढ्या रक्कमेचे कामाच्या निविदा मागवुन सदर कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर काम प्रगतीपथावर आहे. दुसऱ्या टप्प्यापर्यंत काम अंतिम टप्प्यात असून सदर कामामध्ये मध्यवती अंगणाचे लॅडस्केप, जमिनीच्या सफाट करुन केलेल्या बुरजापर्यंत प्रवेश बुरजाकडे जाणाऱ्या पायऱ्या, बेलाल्ट पायऱ्या, बुरजाच्या भिंतीची दुरुस्ती, जिण्याच्या दुरुस्तीसह अंतर्गत खोल्याची स्वच्छता पॉईटींग आणि फाऊंडेशन सह बुरजाच्या टेकडीवर नविन यु.सी.आर.भिंत बांधणे, कमान भिंतीची दुरुस्ती, विहीरीचे सिमेंट प्लास्टर करणे इत्यादी बाबीचा समावेश आहे.

सदर सुशोभिकरणाच्या कामाचे तिसऱ्या टप्प्यामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या सल्लागारामार्फत अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. सदर कामाचे तिसऱ्या टप्प्यामध्ये पुर्वेकडील कमानी भिंतीचे बांधकाम ईशान्य खोलीची जिर्णोव्दार / दक्षिण बाजुचे भिंतीचे काम, स्टोरेज ग्रेनरीज अंतर्गत फुटपाथ, बुरजावर फरसबंदसिंह पायऱ्याच्या पायासह उत्तर बाजुच्या सदर भिंतीचे यु.आर.सी.चे बांधकाम, सुरक्षा व शौचालय व्यवस्था, किल्लावरील विद्युत कामे बुरजावर लाकडी तोफ स्टॅंडची व्यवस्था तयार करणे, स्वयंचलित

स्प्रिंकलर प्रणाली व प्लंबिंग कामे, बेंच बसविणे इ.कामाचा समावेश आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रु.13,15,92,327/- इतक्या रक्कमेचे आहे. सदर किल्ला परीपुर्ण होण्यासाठी सदर कामे करणे आवश्यक आहे.

सदर कामासाठी सन 2021-22 सद्यस्थितीत तरतुद उपलब्ध नसुन सदर काम करणे गरजेचे असल्यामुळे सन 2022-23 या आर्थिक वर्षात तरतुद करावी लागणार आहे व सदर काम तद्नंतर हाती घ्यावे लागेल. सदर बाब माहितीस्वत व मंजुरीकरीता सविनय सादर करण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Pc-09/VP/2021-22/DK/MG-4

गोषवारा प्राप्त दि. ०८/११/२०२१ वेळ :- दु. २.४० वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. ....५९...... वर्ष :- 2021-22

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**// घनकचरा विभाग //**

**मा. महासभा दि.२५ / ७ /2022**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (६६)** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर स्वखर्चाने कचरा प्रकल्प तयार करणेसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे प्रभाग क्र.04 मध्ये मे. किंग द डिफरन्स चॅरीटेबल ट्रस्ट, या संस्थेने स्वखर्चाने लहान स्वरूपात कचरा प्रकल्प तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे 10,000 चौरस फुट क्षेत्राची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक सर्व साधन सामुग्री, वीज, पाणी, मनुष्यबळ, कार्यालय इ. सदर संस्था स्वत:च्या खर्चाने करणार आहे. सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारण्यात येणार असून उत्तन येथे कचरा वाहतूकीसाठी लागणाऱ्या गाड्या व त्यावरील खर्चाची बचत होणार आहे. सदर प्रकल्पा ठिकाणी गृहनिर्माण संस्थाच्या पदाधिकाऱ्यांना कचरा विलगीकरण, कचऱ्याची व्हीलेवाट लावणे, कचरा प्रक्रीया याबाबत माहिती देऊन जनजागृती देखिल करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत प्रभाग समिती क्र.4 क्षेत्रात आरक्षण क्र.219 मधील 10,000 चौरस फुट क्षेत्राची जागा तात्पुरत्या स्वरूपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्यास सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर उभारता येऊ शकेल. तरी सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रति,
नगरसचिव,
मिरा भाईंदर म.न.पा.

PC-5/2021-22/DK/MG-2

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मां. महासभा दि.२५/७ /२०२२

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( ८९ ) ऑटोमॅटिक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत.**

वरील विषयानुसार आपणांस कळवितो की, मिरा भाईदर क्षेत्रातील शासकीय व खाजगी शाळांचे अग्निशमन विषयक परिक्षण करून शाळा / कॉलेज इमारतींना विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेतच्या दृष्टीकोनातून तात्काळ अग्निशमन यंत्रणा उभारणेकामी मा. सहा. आयुक्त, शिक्षण विभाग यांनी या विभागास कळविले आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अखत्यारित असणाऱ्या मनपा शाळा, शासकीय कार्यालय, रुग्णालये, समाज मंदिरे, वाचनालये इ. ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन अग्निशमन उपाययोजनेकरीता बाजारात नव्याने आलेले **ऑटोमॅटीक फायर बॉल** अशी अग्निरोधके बसविणे उपयुक्त ठरु शकते. आग हे असे संकट आहे ज्याची पूर्वसूचना न मिळता मोठया प्रमाणात जिवित व वित्तहानी होवू शकते व सध्या आगीमुळे अनेक ठिकाणी भयानक अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. अश्या संभाव्य धोक्यापासुन संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक/ अद्ययावत अग्निशमन यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**ऑटोमॅटीक फायर बॉल** वितरीत करीत असलेल्या वितरकांनी अग्निशमन विभागात भेट देवून सदर **ऑटोमॅटीक फायर बॉल** बाबत प्रात्येक्षिके करून दाखविले आहेत. सदरचे उपकरणे स्वयंचलित असल्याने इतर फायर एक्स्टिंग्युशर यंत्रणेच्या तुलनेत फारच उपयुक्त असुन सर्व प्राथमिक स्वरुपाच्या आगी विझविण्यासाठी उपयुक्त आहे.

**ऑटोमॅटीक फायर बॉल** हे उपकरण बाजारात नव्याने आलेले असुन **नॅशनल टेस्ट हाउस सर्टीफिकेट (GOVERNMENTOF INDIA LABORATORY)** तसेच **ॲडव्हांन्स फायरटेक ॲण्ड रिसर्च लॅब प्रा. लि., दिल्ली** यांनी प्रमाणीत केलेली असुन सदर उपकरणाची सद्यःस्थितीत वापरात असलेल्या अग्निशामक उपकरणा सोबत तुलना केली असता, काही ठळक बाबी निदर्शनास आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

| अ. क्र | तपशील | ऑटोमॅटिक फायर बॉल एक्स्टिंग्युशर | रेग्युलर फायर एक्स्टिंग्युशर |
|---|---|---|---|
| १) | वापर उपयुक्तता | तंत्र कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासत नाही. (AUTOMATIC OPERATED) | तंत्रकुशल मनुष्यबळा शिवाय वापर करणे शक्य नाही. |
| २) | बनावट | मेड ऑफEPS (THARMOCOLE MATERIAL) | माइल्ड स्टील |
| ३) | वॉरंटी | ०५ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्षापर्यंत |
| ४) | मान्यता | १) नॅशनल टेस्ट हाउस सर्टीफिकेट **(GOVERNMENT OF INDIA LABORATORY)**<br>२) **ADVANCE FIRETEC AND RESEARCH LAB PVT. LTD** | **BIS** मान्यता |
| ५) | कोणत्या आगीवर उपयुक्त | सर्व प्रकारच्या | सर्व प्रकारच्या |
| ६) | वापरण्याची पध्दती | प्रत्यक्ष आगीजवळ जाण्याची आवश्यकता नाही. | प्रत्यक्ष आगीजवळ जावुन अग्निशमन कार्य करावे लागते. |

वरील प्रमाणे **ऑटोमॅटिक फायर बॉल** या स्वयंचलित अग्निरोधकाची ठळक वैशिष्टये लक्षात घेता मिरा भाईदर महानगरपालिका शाळा व शैक्षणिक इमारत व इतर कार्यालयात सदर अग्निरोधके बसविणे हितावह ठरेल.

सदर उपकरण हे स्वयंचलित असल्याने आगीवर वापरणे करीता तंत्र-कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नसुन सर्व प्रकारच्या लहान आगींवर उपयुक्त असल्याने सदरचे अग्निरोधक खरेदी केल्यास सर्व प्रकारच्या आगींवर वापरता येईल. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने **ऑटोमॅटीक फायर बॉल** उपयुक्त आहे.

शासनाच्या **GeM PORTAL** वरील **AUTOMATIC FIRE BALL** या १ कि. ग्रॅ. क्षमतेच्या अग्निरोधकाची १८% जी. एस. टी. सह किंमतीचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | दर प्रतिनग (रु.) जी. एस. टी. १८%सह | एकुण (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | १ कि. ग्रॅ. क्षमतेचे | ७,४०० | ७,४०० |

सदर उपकरणांची अंदाजे किंमत वर नमुद केल्याप्रमाणे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अखत्यारितील ३६ शाळा, रुग्णालये, मनपा इमारतीत सदरचीयंत्रणा बसविणेकरीता १ कि. ग्रॅ. क्षमतेचे **१४१७** नग खरेदीकरिता प्रति नग रु. ७,४००/- या दराने **रु. १,०४,८५,८००/-**इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

सन २०२१-२२ या चालु आर्थिक वर्षात **साधन सामुग्री व भांडारे** यांची खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत **रू. २२५.००/- लाख** इतकी तरतूद आहे. चालु आर्थिक वर्षात सदर तरतुदीतुन कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

तरी अग्निशमन विभागाकरीता **AUTOMATIC FIRE BALL** या १ कि. ग्रॅ. क्षमतेचे **१४१७ नग GeM PORTAL** वर खरेदी करणे करीता **GeM PORTAL** वर निविदा प्रक्रिया राबविणेस व सदर येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(मारुती गायकवाड)**
**उप-आयुक्त**
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेनुसार**

मिरा भाईंदर महानगरपालिका
... विभाग
दिनांक: / /20

गोषवारा प्राप्त दि २०/१९ /२०२१
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ५६ वर्ष :- २०२१-२२

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २५/ ७ /२०२३

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( ९० ) ऑटोमॅटिक फायर बॉल (अग्निरोधके) यंत्रणा खरेदी करणेबाबत.**

वरील विषयानुसार आपणांस कळवितो की, मिरा भाईंदर क्षेत्रातील शासकीय व खाजगी शाळांचे अग्निशमन विषयक परिक्षण करून शाळा / कॉलेज इमारतींना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तात्काळ अग्निशमन यंत्रणा उभारणेकामी मा. सहा. आयुक्त, शिक्षण विभाग यांनी या विभागास कळविले आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अखत्यारित असणाऱ्या मनपा शाळा, शासकीय कार्यालय, रुग्णालये, समाज मंदिरे, वाचनालये इ. ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन अग्निशमन उपाययोजनेकरीता बाजारात नव्याने आलेले **ऑटोमॅटीक फायर बॉल** अशी अग्निरोधके बसविणे उपयुक्त ठरु शकते. आग हे असे संकट आहे ज्याची पूर्वसूचना न मिळता मोठया प्रमाणात जिवित व वित्तहानी होऊ शकते व सध्या आगीमुळे अनेक ठिकाणी भयानक अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. अश्या संभाव्य धोक्यापासुन संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक/ अद्ययावत अग्निशमन यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**ऑटोमॅटीक फायर बॉल** वितरीत करीत असलेल्या वितरकांनी अग्निशमन विभागात भेट देवून सदर **ऑटोमॅटीक फायर बॉल** बाबत प्रात्यक्षिके करून दाखविले आहेत. सदरचे उपकरणे स्वयंचलित असल्याने इतर फायर एक्स्टिंग्युशर यंत्रणेच्या तुलनेत फारच उपयुक्त असुन सर्व प्राथमिक स्वरुपाच्या आगी विझविण्यासाठी उपयुक्त आहे.

**ऑटोमॅटीक फायर बॉल** हे उपकरण बाजारात नव्याने आलेले असुन **नॅशनल टेस्ट हाउस सर्टीफिकेट** (GOVERNMENTOF INDIA LABORATORY) यांनी प्रमाणीत केलेली असुन सदर उपकरणाची सद्यःस्थितीत वापरात असलेल्या अग्निशामक उपकरणा सोबत तुलना केली असता, काही ठळक बाबी निदर्शनास आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

| अ. क्र | तपशील | ऑटोमॅटिक फायर बॉल एक्स्टिंग्युशर | रेग्युलर फायर एक्स्टिंग्युशर |
|---|---|---|---|
| १) | वापर उपयुक्तता | तंत्र कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासत नाही. (AUTOMATIC OPERATED) | तंत्र कुशल मनुष्यबळाशिवाय वापर करणे शक्य नाही. |
| २) | वापरण्याची पध्दती | प्रत्यक्ष आगीजवळ जाण्याची आवश्यकता नाही. | प्रत्यक्ष आगीजवळ जावुन अग्निशमन कार्य करावे लागते. |
| ३) | बनावट | मेड ऑफ HDP | माइल्ड स्टील |
| ४) | वॉरंटी | ५ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्षापर्यंत |
| ५) | मान्यता | नॅशनल टेस्ट हाउस सर्टीफिकेट (GOVERNMENT OF INDIA LABORATORY) | **BIS** मान्यत. |
| ६) | कोणत्या आगीवर उपयुक्त | सर्व प्रकारच्या | सर्व प्रकारच्या |

वरील प्रमाणे **ऑटोमॅटिक फायर बॉल** या स्वयंचलित अग्निरोधकाची ठळक वैशिष्टये लक्षात घेता मिरा भाईंदर महानगरपालिका शाळा व शैक्षणिक इमारत व इतर कार्यालयात सदर अग्निरोधके बसविणे हितावह ठरेल.

सदर उपकरण हे स्वयंचलित असल्याने आगीवर वापरणे करीता तंत्र-कुशल मनुष्यबळाची आवश्यकता नसुन सर्व प्रकारच्या लहान आगींवर उपयुक्त असल्याने सदरचे अग्निरोधक खरेदी केल्यास सर्व प्रकारच्या आगींवर वापरता येईल. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने **ऑटोमॅटीक फायर बॉल** उपयुक्त आहे.

शासनाच्या GeM PORTAL वरील AUTOMATIC FIRE BALL या १.८ कि. ग्रॅ. क्षमतेच्या अग्निरोधकाची १८% जी. एस. टी. सह किंमतीचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | दर प्रति नग (रु.) जी. एस. टी. १८%सह | एकुण (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | १.८ कि. ग्रॅ. क्षमतेचे (Gross Weight 2.5Kg) | ८,९०९ | ८,९०९ |

सदर उपकरणांची अंदाजे किंमत वर नमुद केल्याप्रमाणे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अखत्यारितील ३६ शाळा, रुग्णालये, मनपा इमारतीत सदरची यंत्रणा बसविणेकरीता १.८ कि. ग्रॅ. क्षमतेचे १२८९ नग खरेदी करिता प्रति नग **रु.** ८,९०९/- या दराने **रु.** १,१४,८३,७०१/-इतका अंदाजित खच अपेक्षित आहे.

सन २०२१-२२ या चालु आर्थिक वर्षात **साधन सामुग्री व भांडारे** यांची खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत **रू. २२५.००/- लाख** इतकी तरतूद आहे. चालु आर्थिक वर्षात सदर तरतुदीतुन कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

तरी अग्निशमन विभागाकरीता **AUTOMATIC FIRE BALL** या १.८ कि. ग्रॅ. क्षमतेचे **१२८९ नग GeM PORTAL** वर खरेदी करणे करीता **GeM PORTAL** वर निविदा प्रक्रिया राबविणेस व सदर येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेनुसार**

**(मारुती गायकवाड)**
**उप-आयुक्त**
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. २४/११/२०२१
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ५७ वर्ष :- 2021-22

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२५/७ /2021

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (८९) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारत बांधकाम प्रस्तावामध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर अनामत शुल्काबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1296/847/सीआर-162/96/युडी-12, दि.14/05/97 अन्वये मंजूर करण्यात आलेली असून ती दि.15/07/97 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-1298/941/सीआर-89/98/युडी-12, दि.25/08/2000 अन्वये मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे.

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/ प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

दि.29/08/2009 रोजीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली फेरबदलातील विनियम क्र.5.3x and xi (Appendix - 1) नुसार इमारत बांधकाम क्षेत्राकरीता अनामत रक्कम रु.20/- (प्रती चौ.मी.) याप्रमाणे वसुल करण्यात येते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने पत्र क्र. मनपा/नर/34/2011-12 दि.07/04/2011 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींस बांधकाम परवानगी देताना इमारत बांधकाम क्षेत्राकरीता मालमत्ता कर अनामत शुल्क रु.210/- (प्रति चौ.मी.) याप्रमाणे शुल्क आकारणे बाबत आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

सदरचे आदेश हे मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम 5(3) (xi) नुसार आकारण्यात येत आहेत.

सदरचे आदेश जे विकासक इमारती भोगवटा दाखला न घेता विकासक इमारती रहिवास व्याप्त करतात अश्या इमारतींस कर व शास्तीची रक्कम इमारतीमधील सदनिका धारकांकडून वसुल करण्यास लागू नये म्हणून लागू करण्यात आलेले आहेत.

सदरची मालमत्ता कर अनामत रक्कम इमारतीस भोगवटा दाखला घेतल्यानंतर तीन वर्षानंतर विकासकास व्याजाची आकारणी न करता परत देणेबाबत नमुद केलेले आहे.

सदर आदेशानुसार उपरोक्त रक्कम हि महानगरपालिकेच्या लेखा विभागाने स्वतंत्रपणे खाते निर्माण करुन जमा करुन घ्यावयाची आहे. तसेच उपरोक्त रक्कमेची इतर कोणत्याही कामासाठी खर्च करावयाचा नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत सन 2017-18 पासून सदर रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा वर्षनिहाय जमा रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मालमत्ता कर जमा रक्कम |
|---|---|---|
| 1) | 2017-18 | रु.1,94,26,623/- |
| 2) | 2018-19 | रु.8,03,05,703/- |
| 3) | 2019-20 | रु.5,40,33,216/- |
| 4) | 2020-21 | रु.3,49,82,248/- |
| एकूण रक्कम | | रु.18,87,47,790/- |

सदरची रक्कम हि अनामत रक्कम असल्यामुळे दि.07/04/2011 रोजीच्या आदेशानुसार उपरोक्त रक्कम इतर कामासाठी खर्च करता येणार नाही.

उपरोक्त प्रकरणाच्या अनुषंगाने वरील वस्तुस्थिती सदर प्रकरणात महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 5/9/2022 वेळ ११:२५ वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 62 वर्ष :- 2021-22

नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग**

मा. महासभा दि. २५/७ /२०२२

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.:- ९२ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके इत्यादी ठिकाणची निगा व देखभाल करणेच्या कामाची माहिती सादर करणे करीता मा. महापौर यांनी दि.२७/१२/२०२१ रोजी चे पत्र संदर्भात वस्तूस्थिती अहवाल.**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि.२४/१२/२०२१ (दि.०१/१२/२०२१ रोजीची तहकुब सभा) रोजी ऑनलाईन पध्दतीने मा. महासभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर महासभेमध्ये उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाशी संबंधीत प्रकरण क्र. ७२ विषयाच्या अनुशंगाने खालील प्रमाणे वस्तूस्थिती आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल यापुर्वी मजूरांमार्फत कामानिहाय निविदा मागवून करण्यात येत होते परंतु सदर काम समाधानकारक होत नसल्याने त्यास मा.महासभा ठराव क्र. २५ दि. ०७/०६/२०१९ नुसार मान्यता दिली त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या Park and Garden च्या २०१५-१६ च्या DSR प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन मा. आयुक्त यांच्या दि. ३१/०५/२०२० रोजीच्या मंजूरीने दि.०१/०६/२०२० रोजी जाहिर निविदा सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करुन E-Tendering Online पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत १)KHFM Hospitality & facility Management service २) मे. गुरुजी इंन्फ्राप्रोजेक्टस व ३) मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांच्या अशा ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर प्राप्त निविदाधारकांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी दि. २२/०६/२०२० रोजी करुन पात्र ०२ निविदाधारक मे. गुरुजी इंन्फ्रा प्रोजेक्ट व मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांच्या दराच्या लखोटा (Financial Bid) उघडण्यास निविदा समितीच्या मान्यतेने दि. २३/०६/२०२० रोजी दराचा लखोटा उघडला असता मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांची कमी दराची (L१) निविदा प्राप्त झाली. प्राप्त दरावर वाटाघाटी अंती दरास निविदा समितीने दि.२४/०६/२०२० रोजी मान्यता दिली. प्राप्त L१ निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ क नुसार संविदा करण्यासाठी दि. २४/०६/२०२० रोजीच्या मा.आयुक्तांच्या मान्यतेने गोषवारा मा. स्थायी समितीकडे पाठविण्यात आला होता.

त्यानुसार दि. १७/०८/२०२० रोजीच्या मा.स्थायी समितीच्या अजेंडावर सदर विषय घेतला परंतु मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २७ दि. १७/०८/२०२० अन्वये उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाने मा. महसभा ठराव क्र. २५ दि.०७/०६/२०१९ प्रमाणे निविदा मागविलेली नसल्याचे कारण देत निविदेस संविदा करणेस मान्यता दिली नाही. तथापी यामध्ये तथ्यता नसून प्रशासनाने सदर ठरावाप्रमाणेच निगा व देखभाल कामाचे अंदाजपत्रक करुन ऑनलाईन ई-निविदा मागवून त्याप्रमाणे L१ दरास मा. स्थायी समितीच्या मान्यतेस पाठविण्यात आले होते तसेच मा. महासभा दि. ०७/०६/२०१९ च्या ठरावातील इतर बाबी या विविध विभागामार्फत करणे अपेक्षित असल्याने त्यांचे स्वतंत्र अंदाजपत्रक करुन त्याप्रमाणे निविदा करणे त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे व ते नियमानुसार योग्य होते. तथापी मा.स्थायी समितीने त्यास मान्यता दिलेली नाही.

सदर मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २७ दि. १७/०८/२०२० हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१ नुसार सदर ठराव रद्द करुन संविदा करणेकरीता दि.२८/०९/२०२० रोजी मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे पाठविण्यात आला होता.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक, मिभाम-११२०/ प्र.क्र.४६/ नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झालेला आहे.

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-११२०/प्र.क्र.४६/नवि-२८ दि.०२/०३/२०२१ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने, दुभाजके व इत्यादी ठिकाणांच्या देखभालीकरीता राबविलेली निविदा फेटाळण्याचा तसेच नव्याने निविदा मागविण्याबाबतचा, स्थायी समिती सभेने पारीत केलेला व दि. १८/११/२०२० च्या शासन निर्णयान्वये निलंबित केलेला ठराव क्र. २७, दि.१७/०८/२०२० हा महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या विरोधात असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१(३) अन्वये अंतिमत: विखंडीत करण्यात येत आहे.

२. तसेच आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सदर प्रकरणी ऑनलाईन पध्दतीने राबविलेली निविदा प्रक्रिया व त्याअनुषंगाने स्थायी समिती प्र.क्र.३०, दि. १७/०८/२०२० मधील गोषवाऱ्यानुसार मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांची कमी दाराची निविदा मंजूर करुन निविदेतील अटी शर्तीनुसार करारनामा करुन कार्यादेश देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन आदेशा विरोधात मा. उच्च न्यायालय रिट याचिका क्र.- ९९८५७/२०२० ही याचिका दाखल झाली तथापी मा. उच्च न्यायालयाने सदर याचिका निकाली काढली, उक्त दि. ०२/०३/२०२१ चा शासन निर्णय व दि.३०/०३/२०२१ चा मा.उच्च न्यायालयाचा निर्णयानुसार L१ ठेकेदार मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांना मा.आयुक्त यांच्या दि. ३१/०३/२०२१ रोजीच्या मान्यतेने निविदा स्वीकृतीबाबत पत्र देऊन करारनामा करुन दि.१२/०४/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आलेला असून सद्स्थितीत मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांच्या मार्फत उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभालीचे काम चालू असून गोषवाऱ्यामधील नमुद लेखाशिर्षका मधुन खर्च करण्यात येत आहे. तसेच झालेल्या कामानुसार त्यांचे देयक अदा करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) तसेच कलम ४५१ मधील तरतुदी विचारात घेऊन शासन निर्णय व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार महानगरपालिकेने निविदा संविदा प्रक्रीया पूर्ण करुन कामाचे कार्यादेश दिलेले आहेत व ते नियमानुसार योग्य आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे सदर विषयाची वस्तुस्थिती दर्शक अहवाल मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर.

(संजय शिंदे)
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 09/9/2022 वेळ 3.१५ वा.
मा. ~~स्थायी~~ समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 68 वर्ष :- 2021-22

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२५/ ७ /2022.**

**सार्व. आरोग्य विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण :-** ०३ **सन 2022-23 या आर्थिक वर्षात कच्चे/पक्के नाले सफाई/खोदाई व सक्शन पंप भाड्याने घेणे कामाची निविदा मागविणेबाबत.**

अ) <u>पावसाळ्यापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई/ खोदाई करणे :-</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्रफळ 79 चौ.कि.मी इतके आहे. राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगरावरून पावसाळया दरम्यान येणारे पावसाचे पाणी महानगरपालिकेच्या नाल्यांमार्फत खाडी/ समुद्र यामध्ये निचरा होत असतो. शहरातील सुमारे 155 नाले (बंदीस्त व कच्चे नाले) व ज्या ठिकाणी नाले खाडी/समुद्रास मिळतात ती खाडीपात्र दरवर्षी पावसाळ्यापुर्वी सफाई करणे व निघालेला गाळ /माती/ कचरा वाहतुक करणे आदी कामाकरिता आवश्यक लागणारी विविध यंत्रसामुग्री जसे जे.सी.बी.मशीन, पोकलन मशीन, बोटसह पोकलन मशीन, हायड्रा मशीन, डंपर, टोरस तसेच मनुष्यबळ इत्यादी भाड्याने उपलब्ध करून शहरातील कच्चे/ पक्के नाले सफाईची कामे पावसाळ्यापुर्वी मुदतीत पुर्ण करणे आवश्यक आहे. सदर कामी रु. 3.50 कोटी खर्च अपेक्षित आहे.

ब) <u>सक्शन पंप भाड्याने घेणे :-</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे खाडी लगत वसलेले आहे. शहरात एकुण 48 सखल/ अतिसखल भाग परिसर आहेत. पावसाळ्या दरम्यान तसेच समुद्राच्या भरतीच्या वेळी पावसाचे पाणी रहिवासी/ बैठी घरे/ झोपडपट्टी आदी परिसरात साचून राहते. त्यामुळे सदर परिसरात राहणाऱ्या नागरीकांना गैरसोय होवू नये याकरिता साचलेल्या पाण्याचा तातडीने उपसा करणे आवश्यक आहे. याकरिता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेऊन पाण्याचा उपसा करण्याची कामे करण्यात येत असतात. पावसाळया दरम्यान नागरीकांची होणारी गैरसोय वेळीच टाळणेकामी यावर्षी सुध्दा सदर कामाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे आवश्यक आहे. सदर कामी रु. 75.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे.

शहरातील कच्चे/ पक्के नाले पावसाळ्यापुर्वी सफाई/खोदाई करून गाळ/ माती/ कचरा वाहतुक करणे व विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे कामाच्या निविदा मागविणे, कार्यादेश देणे व प्रत्यक्ष काम सुरू होण्यास लागणारा कालावधी, तसेच सदरची काम अत्यावश्यक सेवेत येत असल्याने त्याचप्रमाणे सन 2022 ची मान्सुनपुर्व तयारी म्हणून शहरातील नाले सफाई कामाची वार्षिक निविदा प्रक्रिया पुर्ण करून नाले सफाईची कामे मुदतीत सुरू करण्याची खबरदारी घेणेबाबत मा. आयुक्त यांनी कळविले आहे.

वर नमुद "अ" "ब" मधील कामाच्या निविदा प्रक्रिया पुर्ण करणे व याकामी येणारा खर्च सन 2022-23 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील तरतुदीच्या अधिन राहून तसेच तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून शहरातील कच्चे, पक्के नाले पावसाळ्यापुर्वी मुदतीत सफाई करणे व विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे कामाच्या निविदा मागवविणेबाबतचा प्रस्तावास मा. महासभची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nala Safai 2022.docx